# प्रकरण- ५

# उपसंहार

# प्रकरण ५

# उपसंहार

कादंबरी हा सर्वसमावेशक असा रचनाप्रकार असून त्याच्या सीमारेषा निश्चित करता येत नाहीत. कादंबरी म्हणजे अशी साहित्यकृती आहे जिला प्रदीर्घ भाषिक अवकाश, अनेकपदरी आशयसूत्रे आणि विस्तृत रचना असून ती संपूर्णतेकडे झुकलेली असते. अशी भूमिका बांदिवडेकर आणि भालचंद्र नेमाडे यांनी मांडली आहे. त्याचा आधार घेऊन कादंबरी संकल्पनेचा विचार केला असून या परिचात दलित कादंबरीचा विचार केला आहे. यासाठी प्रथम दलित संकल्पना विचारात घेतली आहे. ज्यांची सर्वांगाने घुसमट किंवा कुचंबनाच आलेली आहे. असे सामाजिक समूह म्हणजे 'दलित' हे सूत्र विचारात घेतले असून सामान्यत: अस्पृश्य, भटके, गुन्हेगार व आदिवासी या जातीसमुहांच्या जीवनजाणिवा ज्या कादंबरीत मांडल्या जातात, त्याला 'दलित कादंबरी' म्हणून संबोधन उपयोजिले आहे. दलित साहित्यांच्या व्याख्यांचा विचार करता अनेक साहित्यिकांना दलित साहित्याच्या व्याख्येविषयी आपली मते नोंदविली आहेत. त्यामध्ये दलितांच्या सर्वांगीण जीवनाचे कलात्मक साहित्य म्हणजे दलित साहित्य, दलित जीवनाच्या जाणिवेचे भेदक दर्शन घडविणारे ते दलित साहित्य, पूर्वी कधीही न रेखाटलेले स्वत्व म्हणजे दलित साहित्य, ज्ञान- विज्ञानापासून वंचित असा समाज जेव्हा स्वत:ला व्यक्त करण्यासाठी लेखनी उचलतो ते साहित्य म्हणजे दलित साहित्य, हजारो वर्षे अत्याचारयुक्त जीणे जगलेल्या अस्पृश्यांचे साहित्य हे दलित साहित्य, तळागाळातील व्यक्तिच्या आशाआकांक्षा व जीवनजाणिवांचे साहित्य म्हणजे दलित साहित्य होय. अशी मते नोंदविलेली आहेत. अशा व्याख्या तर्कतीर्थ जोशी, भालचंद्र, फडके, डॉ. पानतावने, रमेश परमार व केशव मेश्राम आणि गो.म.कुलकर्णी इत्यादी मान्यवरांनी केलेल्या आहेत.

मराठीमध्ये चोखामेळा, केशवसूत, महात्मा फुले, कार्ल मार्क्स यांच्या प्रेरणेतून दलित साहित्यनिर्मिती केली आहे असे काही अभ्यासकांनी म्हटले असले, तरी डॉ. आंबेडकरांची प्रेरणा ही दलित साहित्यामागे असल्याचे सर्वमान्य आहे. किंवा डॉ. आंबेडकरांच्या या तत्वप्रणालीतून निर्माण झालेली तत्वे म्हणजेच वेदना, विद्रोह, मानवतावाद आणि नकार या तत्वांचेच प्रतिबिंब दलित साहित्यातील निरनिराळ्या वाङ्मय प्रकारांतून झाले असल्याचे प्रत्ययास येते. लक्ष्मण गायकवाड यांची 'वकिल्या पारधी' ही आणि भास्कर भोसले यांची 'दैना' या कादंबऱ्या आंबेडकरी प्रेरणेतूनच लिहिलेल्या आहेत.

'दलित कादंबरी' या वाङ्मयप्रकाराचा प्रारंभ करणारे कादंबरीकार यामध्ये आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, ना.रा.शेंडे, नामदेव व्हटकर आदींचा उल्लेख करता येतो.

अण्णा भाऊंनी इतर वाङ्मयप्रकाराबरोबरच कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्येही आंबेडकरांचे बंडखोर विचार व्यक्त केले आहेत. तसेच शंकरराव खरातांनाही आपल्या कादंबऱ्यातून उपेक्षित जाती-जमाती, भटके-विमुक्त, झोपडपट्टीमध्ये जगणाऱ्या मानवी समुहांचे जीवन चित्रित केले आहे. त्याचप्रमाणे आंबेडकरी प्रेरणेने भारावलेल्या ना.रा.शेंडे यांनीही कादंबरी क्षेत्रासाठी लेखणी वापरली परंतु दलित कादंबरीकार म्हणून ते ओळख निर्माण करू शकले नाहीत. तसेच महाराष्ट्राला तमाशाची ओळख करून देणारे नामदेव व्हटकर यांनीही दलित कादंबरी क्षेत्रात दिलेले योगदान महत्त्वाचे आहे.

त्यानंतरच्या दलित कादंबरीच्या इतिहासामध्ये योगदानाच्या दृष्टीने महत्त्व देता येण्यासारखे कादंबरीकार म्हणजे ज.वि.पवार, निशिकांत शेंडे, भिमसेन देठे, भि.शि.शिंदे, सुधाकर गायकवाड, मुरलीधर जाधव, नामदेव कांबळे आणि इतर कादंबरीकारांनी दलितांच्या विविध प्रश्नांना, समस्यांना हात घातला. तसेच डॉ.

आंबेडकरांचे दीपवून टाकणारे व्यक्तिमत्व आणि आंबेडकरी चळवळ, धर्मांतरानंतरच दलितांवरील अत्याचार, आंबेडकरी कार्याची ओळख, त्याचप्रमाणे महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांचे चरित्र तसेच शिवकालीन, पेशवेकालीन कर्तृत्वावर झोत, ऐतिहासिक आढावा इ. अनेक प्रश्नांवर प्रकाश टाकलेला असला तरी त्यातील कादंबऱ्यामध्ये दलितांच्या संपुर्ण जीवनाच्या दृष्टीने काही त्रुटी जाणवतात. त्या त्रुटी अशोक व्हटकर, नामदेव ढसाळ, बाबुराव बागूल, नामदेव कांबळे आणि योगिराज वाघमारे इ. कादंबरीकारांनी भरून काढलेल्या आहेत. त्यांनी दलितांचा सर्वार्थाने वेध साहित्यातून घेतला. व अंधश्रद्धा बाळगणारा अस्पृश्य समाज रेखाटणारे अशोक व्हटकर, कवितेचे अवकाश अधिक विस्तृत करणाऱ्या नामदेव ढसाळांच्या कादंबऱ्यांतून दलितांची विविध रूपे प्रकट झाली आहेत. बाबुराव बागूल कादंबरीतून पारंपरिक तत्त्वज्ञान फोल ठरवतात व अंधश्रद्धेला न बळी पडता सुखकर जीवन जगतात.

वर्तमान कालीन कादंबरी जगतामध्ये नामदेव कांबळे, शरणकुमार लिंबाळे, अनिल सपकाळ यांसह अनेक नवोदित कादंबरीकार पुढे आलेले आहेत. त्यांना मातंग समाजाच्या व्यथा-वेदना बरोबरच दलितांच्या राजकीय पटलावरील अंतर्विरोध, कोकणातील दलित जीवन इत्यादी समस्यांचा वेध घेतला आहे. अशा तऱ्हेने दलितांचे संपूर्ण जीवन अभिव्यक्त झाले आहे. त्यामध्ये आंबेडकरी प्रेरणा, दलितांमधील जातगटांची प्रतिनिधिक संस्कृती, गावगाड्यातील पारंपरिक रचनाबंध, दलितांतील जाती, त्यांचे व्यवसाय, भाषा आणि राहणीमान इ. बाबींना केंद्रस्थानी मानून दलित कादंबरी लिहिली गेली.

'वकिल्या पारधी' ही कादंबरी स्वातंत्र्यपूर्व काळ ते स्वातंत्र्योत्तर कालखंडतील विमुक्त जमातीमधील 'पारधी' जमातीचे चित्रण करणारी आहे. या कादंबरीमध्ये पारधी जमात ही पृथ्वीतलावरील सर्वात पहिली जमात म्हणजे आदिम जमात

असल्याचे अनेक उदाहरणावरून लेखकाने स्पष्ट केले आहे. पारधी लोक हे आदिवासी असून इतर जमातीपेक्षा ते आजही कसे उपेक्षित राहिले आहे याचे दर्शन येथे घडते. यामध्ये पारधी लोक पूर्वी जंगलामध्येच राहत असतात. त्यांच्या रुढी-परंपरा, सण-समारंभ, नियम, रिती-भाती ते आपापल्या परिने पार पाडत असतात. सर्व पशू-पक्षी, झाडे-वली यांच्या सान्निध्यामध्ये टोळी करून, स्थलांतर करून आनंदाचे जीवन जगत असतात. असे निरागस जीवन जगत असतानाच इंग्रज लोक त्यांच्या आनंदी जीवनामध्ये हस्तक्षेप करू लागतात. जंगलामध्ये रेल्वेमार्ग टाकण्याची योजना ते करू लागतात. त्यामुळे या आदिवासी लोकांच्या जगण्याचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळे ते संघर्ष करु लागतात. तेव्हा हे इंग्रज अधिकारी त्यांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे आल्यामुळे आपल्या अधिकाराचा गैरवापर करून त्या आदिवासी लोकांना 'गुन्हेगारी जमात' ठरवतात. त्या कायद्यानुसार त्यांना तारेच्या कुंपनात बंदिस्त करतात. अशावेळी जंगलातील लंगोटपारधी इंग्रजांपासून सुरक्षित राहण्यासाठी दूर अशा ठिकाणी स्थलांतर करतात. तेथे मेंढपाळांशी संपर्क आल्याने ते आपली वेशभुषा बदलतात. इंग्रजांना भारतातून पळवून लावण्यामध्ये ते अग्रभागी असतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडात त्याना तारेच्या कुंपनातून मुक्त करून 'विमुक्त जमात' असे संबोधन वापरले जाते. परंतु, स्वातंत्र्योत्तर काळातील कायद्यान्वये शिकार करण्यावरती बंदी येते. तेव्हा या पारधी लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. तो प्रश्न सोडविण्यासाठी ते गावातील इतर लोकांप्रमाणे शेती करण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांना स्थिरत्व येऊ न देण्यासाठी गावकरी त्यांना शेती करण्यास विरोध करतात. त्यामुळे हे पारधी लोक लपून-छपून चोरीचा मार्ग अवलंबतात, हातभट्टीचा व्यवसाय सुरू करतात. आणि तेव्हाच गावातील जमीनदाराच्या आदेशाप्रमाणे दरोडा घालून व त्यांच्या सांगण्याप्रमाणे पोलिसांच्या आश्रयाला राहू लागतात. तेथून पुढे त्यांचा गावगाड्याशी संपर्क असल्यामुळे

गावातील राजकारण, अर्थकारण त्यांना कळू लागते. शेती आणि दारू या व्यवसायामुळे बैल-बारदाना, शेळ्या-कोंबड्या येऊन आर्थिक सुबत्ता येते. राजकारणामध्येही त्यांचा प्रवेश होऊ लागतो. त्यामुळे साखर कारखान्याचे चेअरमन व पुढारलेले इतर सवर्णांना त्यांची ही प्रगती पाहवत नाही. ते त्याच्या आड येण्याचा प्रयत्न करतात. त्याचा उलट परिणाम होऊन त्यांच्या प्रगतीत आणखीच भर पडते. तेव्हा ते संतप्त सवर्ण, गावकरी व पोलिसांच्या संगनमताने पारधी हत्याकांड घडवून आणतात. पण त्यातून वाचलेली रानपळ्या या व्यक्तिची पत्नी 'बकरी' या संघर्षातून वाट काढते व नाहक सजा भोगून ती दूर मुंबईला जाते. येथे कादंबरीला कलाटणी मिळते. अत्यंत बिकट परिस्थितीमधून वाट काढत फुगे विकून ती आपला मुलगा 'वकिल्या' व मुलगीला जगवत असते. तेथे मानवताधर्म जोपासणाऱ्या 'फादर गोन्साल्व्हिस' या भल्या व्यक्तिशी त्यांची भेट होते. ते वकिल्याला शिक्षण देण्यासाठी घेऊन जातात.

'वकिल्या पारधी' या कादंबरीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अनेक घटना प्रसंग आलेले आहेत. ते असे - जंगलातील रेल्वेमार्गाची इंग्रजांची योजना आदिवासी लोक उधळून त्यांचे प्रचंड नुकसान करतात, आदिवासी लोकांना गुन्हेगार ठरवून इंग्रज लोक त्यांना तारेच्या कुंपनात बंदिस्त करून त्यांचे अतोनात हाल करतात, जमिनदार देशमुखाच्या सांगण्यावरून नानासाहेब पाटलाच्या वाड्यावर पूर्वनियोजीत दरोडा घालण्याचा प्रसंग, राजकीय लोक, गावातील सवर्ण लोक हे पोलिसांच्या मदतीने पारधी हत्याकांड घडवून आणतात, बादशहा पारधी नामक दरोडेखोर एका सावकाराच्या वाड्यावर दरोडा घालतो, बादशहा पारधी या दरोडेखोराला पकडण्यासाठी पोलिसांनी आखलेली योजना, शिकारी शिवाय अन्य साधन पारधी लोकांकडे उपलब्ध नसल्यामुळे ते उपजीविकेकरता शेळ्या चोरतात, एका पाटलाच्या वाड्यावर पडलेल्या दरोड्याचा संशय पारध्यांवर घेऊन पोलीस

त्यांचा अमानवी छळ करतात, रानपळ्या ही पारधी व्यक्ती अंगामध्ये देव संचारल्याचा आव आणून मंदिरातील मूर्ती चोरते, रानपळ्या या व्यक्तिच्या सासू-सासऱ्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावताना आलेल्या अडचणी इत्यादी प्रसंग या कादंबरीत आलेले आहेत.

या कादंबरीतील घटना व प्रसंगांना सजीव करणाऱ्या मुख्य व्यक्तिरेखांमध्ये बिरडीस, रानपळ्या, बाजीराव देशमुख, नानासाहेब पाटील, घाडगेपाटील, पतंगराव पाटील, बकरी, फादर गोन्साल्व्हिस, वकिल्या, बादशहा पारधी, संजय चौधरी याशिवाय अनेक गौण व्यक्तिरेखा येतात.

'दैना' ही भास्कर भोसले यांची स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पारधी समाजाचे चित्रण करणारी आत्मकथनात्मक कादंबरी आहे. यामध्ये लेखक भास्कर भोसले यांनी आपल्या कुटुंबाच्या रूपाने संपूर्णपारधी समाजाच्या व्यथा, वेदना आणि दुर्लक्षित जीवन समाजासमोर मांडलेले आहे. अगदी प्रांजळपणाने त्यांनी आपल्या लहानपणापासून ते लग्नापर्यंतचा इतिहास तसेच आपल्या आई-वडिलांसह दहा बहिण- भावंडांचे जीवन उलगडून दाखविले आहे. त्यांच्या संपूर्ण कुटुंबालाच अनेक दिव्यातून आयुष्यभर जावे लागले. अनेक अपमान, तिरस्कार पचवतच कसेबसे या सर्व भावंडांनी शिक्षण घेतले. यामध्ये पोलिसांचे, गावकऱ्यांचे, नाहक चोरीचे व त्यामुळे होणाऱ्या अवहेलनेचे अनेक अडथळे आले. पोलिसांच्या भितीने वारंवार पाल सोडून रानोमाळ भटकणे, मोठ्या बहिणीला एकटीला सोडून जीव मुठीत घेऊन पळून जाणे, त्यामुळे कुटुंबाच्या होणाऱ्या दाहीदिशा, आई-वडील व मुलांची होणारी ताटातूट इ. दाहक अनुभवातून भोसलेंच्या कुटुंबाला जावे लागले. यातील वास्तव या कादंबरीतून व्यक्त झाले आहे.

या कादंबरीतील घटना प्रसंगामुळे कथानक प्रवाही झाले आहे. लेखकाच्या वडिलांवर नाहक आरोप होऊन त्यांना अटक होण्याचा प्रसंग, लेखकाचा भाऊ बापू

याच्या चोरी करण्यामुळे संपुर्ण गाव त्याच्या वडिलांना व भावाला पशूसम वागणूक देतात, लग्नात जेवणाच्या पत्रावळ्यावरील उष्ट्या अन्नासाठी लेखकाच्या वडिलांची व तेथील भिकाऱ्यांची भांडणे, पोलिसांच्या भितीने लेखकाच्या कुटुंबातील सर्वांची झालेली पळापळ, भूकेचा प्रश्न सोडविण्यासाठी लेखक व त्याच्या सर्व भावंडांनी केलेली जत्रा, चोरीच्या आरोपामुळे जेवणावरून लेखकाच्या वडिलांची झालेली पळापळ, आणि अविस्मरणीय अशा गारपीठाचा प्रसंग. या कादंबरीत लक्ष वेधून घेतात.

वकिल्या पारधी व दैना या दोन्ही कादंबऱ्या सामाजिक वास्तवाची परिपूर्ण मांडणी करतात. त्यातून पारधी जमातीच्या धार्मिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनावर प्रकाश पडतो. 'वकिल्या पारधी' कादंबरीत आलेले घटनाप्रसंग पुढीलप्रमाणे

सवर्ण लोकांचे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी केलेला पारधी लोकांचा वापर, पोलिसांना घाबरून पळून जाणारे पारधी पोलिसांच्या आश्रयाखाली राजरोसपणे दारूधंदा करू लागतात. स्वत:ची पत वाढवण्यासाठी पोलीस पारध्यांचा छळ करतात, पैशाच्या हव्यासापोटी पोलीस लोक दरोडेखोरांना विकले जातात, पोलीस आणि चोर यांच्यामध्ये आपली संधी साधू पाहणारे सराफ, नोकरी जाण्याच्या भितीने गैरव्यवहार करणारे पोलीस, गरज असेल तिथे मदत करण्याऐवजी गरज नसेल तेथे मदत करणारे शासन, पारधी लोकांच्या सुंदर दिसण्यामुळे संशय घेणारे पोलीस, परंपरेनुसार पारध्यांविषयी पूर्वग्रह बाळगणारे पोलीस, माजी गुन्हेगार जमातीमध्ये सर्वात अधिक जुलूम सहन करणारी पारधी जमात, स्वातंत्र्योत्तर काळात मुलभूत गरजांशिवाय दूर्लक्षीत जीवन  जगणारे पारधी, केवळ अडसर दूर करण्यासाठी 'गुन्हेगार जमात' असा शिक्का मारणारे इंग्रज, उपजीविकेसाठी वाईट मार्गाचा अवलंब करणारे पारधी, पारधी लोकांच्या स्थिरत्वास विरोध करणारे


BARR. B. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

गावकरी, ग्रामीण भागातील जातिभेद, निरपराधी पारध्यांचा बळी घेऊन त्याच्यावर ठपका ठेवणारे पोलीस, आणि भ्रष्ट न्यायदेवता इ. सामाजिक समस्या मांडलेल्या आहेत.

इच्छित परिणाम साध्य करण्यात दैना ही कादंबरी यशस्वी झाली आहे. प्रसंगामुळे कादंबरीला जिवंतपणा आलेला आहे. त्याचबरोबर कादंबरीतील विविध स्वभावाच्या व्यक्तिरेखांमुळे उदा. भास्कर भोसले, ज्ञानबा भोसले, शेवराई, गोदा, बापू, टाकमामा, सिगारेट मामा, बेस्टा मावशी, रतन टिळेकर व त्याचे कुटुंब, शोभा, सदू आजोबा या शिवाय अनेक गौण व्यक्तिरेखा यांची वैचीत्र्य कादंबरीचा आशय उलघडून दाखवण्यासाठी पूरक ठरला आहे.

दैना कादंबरीत 'संतती नियमन' यासारख्या महत्त्वाच्या गोष्टीकडे होणारे दुर्लक्ष, श्रमाचा मोबदला न मिळाल्यामुळे गुन्हेगारीकडे वळणारे पारधी, निष्पाप लोकांना चोरीच्या आरोपाखाली पकडून पैसे काढणारे पोलिस, आरोग्याबाबत अस्वच्छता बाळगणारे पारधी, अंधश्रद्धा अंगी बाळगणारे पारधी, पारधी समाजात मुलिंचा पैशासाठी केला जाणारा वापर, कोणत्याही आरोपाखाली पारध्यांनाच अटक करणारे पोलीस, पारध्यांच्या शासकीय कामात केली जाणारी दिरंगाई, सुंदर पारधी स्त्रियांना येणारे वाईट अनुभव, पारधी समाजातील देवऋषीपण, खाजगी कामातील गैरव्यवहार, पारधी लोकांप्रमानेच सवर्ण लोकांचाही गुन्हेगारीत सहभाग, भटक्या-विमुक्त जमातींचे शिक्षणाकडे दूर्लक्ष, गुन्हेगारीतील नवीन पद्धतीची माहिती, पारधी लोकांना जमिनीवरील हक्कांपासून वंचित केले जाते, इ. पारधी लोकांवर समाजाने आणि पोलिसांनी केलेले अत्याचार हे अस्वस्थ करावयास लावतात.

या दोन्ही कादंबऱ्या सामाजिक वास्तवाशी निगडीत असल्याने या कादंबऱ्या वाङ्मय विशेषांच्या संदर्भात स्वतंत्र आहेत. दलित कादंबरीचा प्रांत उपेक्षित जीवन असा आहे. या परंपरागत नियमांच्या आधारे या कादंबऱ्यांचे

मूल्यमापण शक्य नाही तरीही कादंबरीचे निवेदन, निसर्गवर्णन, घटनाप्रसंगांचे वर्णन, वर्णनात्मक शैली, व्यक्तिरेखा वर्णन, संवाद, उपमा, कादंबरीची भाषा शैली, पारधी संवाद इत्यादी मध्ये कादंबरीकारांनी वास्तव गडद करण्यासाठी जीवनानूभवावर बरहुकूम अशी शैली उपयोगात आणल्यामुळे या कादंबरीतील वास्तव परिणामकारक झाले आहे.

वकिल्या पारधी व दैना या दोन्ही कादंबऱ्या दलित कादंबरीच्या इतिहासातील महत्वाच्या कादंबऱ्या होत. या दोन्ही कादंबऱ्या सामाजिक वास्तवाचा अविष्कार करण्यात यशस्वी झाल्या आहेत. 'पारधी' या गुन्हेगार समजलेल्या जमातीचे प्रभावी दु:ख या कादंबऱ्यातून व्यक्त झाले. उपेक्षित जीवनानुभव आणि त्याला साजेशी रचना, भाषा आणि शैली उपयोजिल्यामुळे या कादंबऱ्या सामाजिक व वाङ्मयीन दृष्ट्या महत्त्वाचा टप्पा ठरलेल्या आहेत.

निष्कर्ष :-

१. दलित कादंबरीच्या इतिहासातील महत्त्वाच्या कादंबऱ्या म्हणून 'वकिल्या पारधी' व 'दैना' या कादंबऱ्यांचा विचार करावा लागतो.

२. दलित जाती-जमाती समुहातील गुन्हेगार समजलेल्या पारधी जमातीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाचे दस्ताऐवज म्हणजे 'वकिल्या पारधी' आणि 'दैना' या कादंबऱ्या होत.

३. अत्याचारी समाजाचे अमानवी व्यवहार आणि अत्याचारपिडीत समाजाचा दुबळेपणा या मानसिक आंदोलनावर प्रकाश टाकण्यात 'वकिल्या पारधी' आणि 'दैना' या कादंबऱ्या यशस्वी झाल्या आहेत.

४. दलित कादंबरी ही विविध सामाजिक अनुभव, अनुभवजन्य भाषा आणि शैलीमुळे कशी नाविण्यपूर्ण आहे, याची साक्ष देणाऱ्या कादंबऱ्या म्हणजे 'वकिल्या पारधी' आणि 'दैना' या कादंबऱ्या होत.

५. एकूणच मराठी कादंबरीला सशक्त सामाजिक अनुभव देण्यात 'वकिल्या पारधी' आणि 'दैना' या कादंबऱ्यांचे योगदान मान्य करावे लागते. कारण या कादंबऱ्या वास्तवाची प्रांजळ अभिव्यक्ति करतात.

**संदर्भ :-**

१. (डॉ. सदा कऱ्हाडे, सामाजिक शास्त्रे आणि साहित्य; अंत:संबंध प्रा.डॉ.ह.श्री.साने, पुणे, पृ.१००१)

## साधन ग्रंथसूची :


१. गायकवाड, लक्ष्मण : वकील्या पारधी
मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई
दुसरी आवृत्ती, २००२.

२. भोसले भास्कर : दैना
रिद्धी प्रकाशन, पुणे
प्रथमावृत्ती, २००३.


## संदर्भ ग्रंथसूची


१. अवचट ,अनिल : माणसं
मौज प्रकाशन गृह, खटाववाडी,मुंबई.
१९९८.

२. अत्रे,त्रि.ना. : गावगाडा
ह.वि.मोटे प्रकाशन, पुणे.
१९५९

३.किरवले, कृष्णा : दलित चळवळ आणि साहित्य,
प्रतिमा प्रकाशन, पुणे,
२००७.

४. कोसारे, एच.एल. : प्राचीन भारतातील नाग,
ज्ञानप्रदिप प्रकाशन, नागपूर.
१९७९.

५. कुलकर्णी, गो.म. : दलित सा. प्रवाह आणि प्रतिक्रिया
प्रतिमा प्रकाशन, १३५५ सदाशिव पेठ,
पुणे-३०, १९८६.

६. खरात शंकरराव : दलित साहित्य प्रेरणा व प्रवृत्ती
इनामदार बंधु प्रकाशन, ६३७,
सदाशिव पेठ, पुणे,१९७८

७.गणोरकर, प्रभा व वसंत डहाके आणि इतर : वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश
प्रकाशक-ग.रा.भटकळ फौंडेशन, मुंबई,
२००१.

८.चव्हाण रामनाथ : भटक्या-विमुक्तांचे अंतरंग,
सुगावा प्रकाशन, पुणे
१९८९.

९. नेमाडे भालचंद्र : टीकास्वयंवर,
साकेत प्रकाशन औरंगाबाद,
२००१

१०. फडके,भालचंद्र : दलित साहित्य वेदना आणि विद्रोह,
श्राविद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे-३०
१९८३.

११. बावणे, लिनकुमार : भटक्यांचा भग्न संसार आणि संस्कृती,
विकास प्रिन्टर्स, औरंगाबाद.
१९९२.

१२.बांदिवडेकर,चंद्रकांत : मराठी कादंबरीचा इतिहास,
मेहता प्रकाशन, पुणे.
१९८३.

१३. मांडे प्रभाकर, : गावगाड्याबाहेर,
परिमल प्रकाशन, औरंगाबाद,
१९८३

१४. माने, लक्ष्मण : विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती एक चिकित्सक अभ्यास, प्रकाशन यशवंतराव चव्हाण, प्रतिष्ठान, मुंबई, १९९७.

१५. राठोड, मोतिराज : बंजारा संस्कृती, प्रिन्स प्रकाशन,औरंगाबाद, १९७६.

१६. सांकृत्यायन, राहुल : घुमक्कड शास्त्र, राजकमल पब्लिकेशन, दिल्ली, १९४६.

१७. K.N.Kadam, : Notes on vimukta jatis and the nomadic tribes of Maharashtrs, 1971.

## नियतकालिकांची सूची :

१. अस्मितादर्श दिवाळी अंक १९७३, संपादक गंगाधर पानतावणे, ऑ.डिसें १९७३.

२. मागोवा, दिवाळी अंक १९७३, दलित सा. प्रेरणा व प्रवृत्ती. पृ.३४

३. १४ वा अस्मितादर्श साहित्य मेळावा, जळगाव १९८८, संपा- बबन चहांदे, प्रकाशनकाळ- १४ व १५ मे १९८८, उद्घाटकीय भाषण- रमेशचंद्र परमार